क्रं. १८

मराठी

छापील:

४३४वे : १

२३६७

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ४३४:वे १(२६५)

ग्रंथ नाम अमृतानुभव.

विषय म. वेदांत.

" Joint Project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(1)

# ॥ अथ अमृतानुभव प्रारंभः ॥

" Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(2)

# अमृतानुभव ग्रंथाची अनुक्रमणिका.


| प्रकरण | नांव. | पत्रांक | ओंव्या |
|---|---|---|---|
| १ | शिवशक्तिसमावेशनमन. .... .... .... .... | ४ | ६४ |
| २ | गुरुस्तवनकथन. .... .... .... .... | ७ | ८० |
| ३ | वाचाऋणमोचन. .... .... .... .... | ९ | ३३ |
| ४ | अभेदज्ञानकथन. .... .... .... .... | ११ | ४३ |
| ५ | सच्चिदानंदपदत्रयविवरण. .... ... | १४ | ६८ |
| ६ | शब्दखंडन. .... .... .... .... .... .... | १९ | १०३ |
| ७ | अज्ञानखंडन. .... .... .... .... .... .... | ३२ | २९५ |
| ८ | ज्ञानखंडन. .... .... .... .... .... .... | ३३ | १९ |
| ९ | जीवन्मुक्तदशाकथन. .... .... .... .... .... | ३६ | ६९ |
| १० | ग्रंथमहिमासर्वोत्कृष्टवर्णन. .... .... .... .... | ३८ | ३१ |


" Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai. "

(2A)

श्रीगणेशायनमः ॥ ॥ यदक्षरमनाख्येयमानंदमयकेवलम् ॥ श्रीमन्निवृत्तिनाथे-
तिख्यातंदैवतमाश्रये ॥ १ ॥ गुरुरित्याख्ययालोकेविद्यासाक्षाद्धिशांकरी ॥ जयत्या
ज्ञानमस्तस्यैदयार्द्रायैनिरंतरम् ॥ २ ॥ सार्धकेनचकस्यार्धशिवयोःसमरूपिणोः ॥
ज्ञातुंनशक्यतेलग्नमितिद्वैतच्छलान्मुहुः ॥ ३ ॥ अद्वैतमात्मनस्तत्त्वंदर्शयंतौमिथस्त-
राम् ॥ तौवंदेजगतामाद्यौतयोस्तत्त्वाभिपत्तये ॥ ४ ॥ मूलायाग्रायमध्यायमूलम-
ध्याग्रमूर्तये ॥ क्षीणाग्रमूलमध्यायनमःपूर्णायशंभवे ॥ ५ ॥ ॥ ॐनमोभगवतेवासु-
देवाय ॥ ऐसींहींनिरुपाधिकें॥ जगाचींजियेंजनकें ॥ तियेवंदिलींमियांमुळिकें ॥
देवोदेवी ॥ १ ॥ जोप्रियूचिप्राणेश्वरी ॥ उलथेआवडीचेसरोभरी ॥ चारुस्थळींएका-
हारी ॥ एकांगाचा ॥ २ ॥ आवडीचेनिवेगें ॥ येकयेकातेंगिळिताहेआंगें ॥ कीं
द्वैताचेनिपांगें ॥ उगळीतेंअहाति ॥ ३ ॥ जेंयेकचिनव्हेयेकसरें ॥ दोघांदोनीपण
नाहींपुरें ॥ कायनेणोंसाकारें ॥ स्वरूपेंजियें ॥ ४ ॥ कैशींस्वसुखाचींआळुकीं ॥
जेदोनीपणमिळोनियेकीं ॥ नेदितीचिकौतुकीं ॥ येकपणफुटों ॥ ५ ॥ हाठावोवरी

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

अमृ० वियोगभिडें ॥ जेंबाळजगाएवढें ॥ वियालीपणनमोडे ॥ दोघुलेपण ॥ ६ ॥ आ- अ०
॥ १ ॥ पुलियेआंगींसंसारा ॥ देखिलीयाचराचरा ॥ परीनेदितीचतिसरा ॥ झोंकलागों प्र. १
॥ ७ ॥ जयांयेकसत्तेचेंबैसणें ॥ दोघांयेकाप्रकाशाचेंलेणें ॥ जेअनादियेकपणें ॥
नांदतीदोघें ॥ ८ ॥ भेदुलाजोनिआवडी ॥ येकरसींदेतबुडी ॥ तोभोगणेंयाथाव
(3) काढी ॥ अद्वैताचाजेथें ॥ ९ ॥ जेणेंदेवेंसंपूर्णदेवी ॥ जियेवीणकांहींनातोगोसा-
वी ॥ किंबहुनायेकोपजीवी ॥ येकयेकांची ॥ १० ॥ कैसामेळुआलागोडिये ॥
दोघेंनमातीजगींइये ॥ कींपरिमाणूंहीमाजीउवायें ॥ मांडिलींअहातीं ॥ ११ ॥
जिहींयेकयेकावीण ॥ नकीजेतृणाचेंहीनिर्माण ॥ जियेंदोघेंजिउप्राण ॥ जियांदो-
घां ॥ १२ ॥ घरवातेंमोटकींदोघें ॥ जेंगोसावीसेजेरिघे ॥ तेंदंपत्यपणेंजागे ॥ स्वा-
मिणीजे ॥ १३ ॥ जयादोघांमाजीयेखादें ॥ विपायेंउमजलेंहोयनिदे ॥ तरीघरवात ॥ १ ॥
गिळूनिनुसुधें ॥ कांहींनाकरी ॥ १४ ॥ दोहोंआंगांचीआटणी ॥ गिवशीतअहा-
तीयेकपणीं ॥ जालीभेदाचियावाहणी ॥ आधाधींजियें ॥ १५ ॥ विषोएकमेकांचीं

Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

3A)

जियें ॥ एकमेकांचींविषयींजायें ॥ जियेंहींदोघींसुखियें ॥ जियेंदोघें ॥ १६ ॥ स्त्री
पुरुषनामभेदें ॥ शिवपणयेकलेंनांदे ॥ जगसगळेंअधाधें ॥ पणेंजिह्नीं ॥ १७ ॥
दोदांडींयेकीश्रुति ॥ दोंफुलींयेकीद्दति ॥ दोहोंदिवींदीप्ति ॥ येकचिजेवीं ॥ १८ ॥
दोंवोठींयेकीगोठी ॥ दोंडोळांयेकीदिठी ॥ तेवींदोघींजिहीसृष्टी ॥ येकिचिजेवीं
॥ १९ ॥ दाऊनिदोनीपण ॥ येकरसाचेंआरोगण ॥ करीतआह्मेहुण ॥ अनादि
जें ॥ २० ॥ जेस्वामीचियेसत्ता ॥ वीणअसोंनेणेंपातिव्रता ॥ जियेवीणसर्वकर्ता ॥
कांहींनाजो ॥ २१ ॥ जेकींभर्ताराचेंदिसणें ॥ भर्तारुजियेचैंअसणें ॥ नेणीजतीदोघें
जणें ॥ निवडूंजियें ॥ २२ ॥ गोडीआणिगुळु ॥ कापूरआणिपरिमळु ॥ निवडूं
जातांपांगुळु ॥ निवाडुहोये ॥ २३ ॥ समग्रदीप्तिघेतां ॥ जेवींदीपुचियेहाता ॥ ते-
वींजियेचियातत्वता ॥ शिवुचिलाभे ॥ २४ ॥ जैसासूर्यमिस्वेप्रभा ॥ प्रभेसूर्यत्व-
चिगाभा ॥ तैशीभेदगिळीतशोभा ॥ येकचिजें ॥ २५ ॥ कांबिंबप्रतिबिंबाद्योतक ॥
प्रतिबिंबबिंबाअनुमापक ॥ तैसेंद्वैतमिसेंयेक ॥ बरवतअसे ॥ २६ ॥ सर्वशून्याचा

(५)



निष्कर्षु ॥ जियाबाईलाकेलापुरुषु ॥ जेणेंदादुलेनसत्ताविशेषु ॥ शक्तिजाली॥२७॥
जियेप्राणेश्वरीवीण ॥ शिवींहीशिवपण ॥ थारोंनेणेतंआपण ॥ शिवेंघडली ॥२८॥
ऐश्वर्येंसींईश्वरा ॥ जियेचेंआंगसंसारा ॥ आपुलाहोऊनउभारा ॥ आपणचिजे
॥ २९ ॥ पतीचेनिअरूपपणें ॥ लाजोनिआंगाचेंमिरवणें ॥ केलेंजगायेवढेंले-
णें ॥ नामरूपाचें ॥ ३० ॥ ऐक्याचाहीदुकाळा ॥ बहूपणाचासोहळा ॥ जियासदैवे-
चियालीळा ॥ दाखविला ॥ ३१ ॥ आंगाचियाआटणिया ॥ कांतुउवायाआणिला-
जिया ॥ स्वसंकोचेंप्रिया ॥ रूढविलीजेणें ॥ ३२ ॥ जियेतेंपहावयाचियालोभा ॥
चढेद्रष्टत्वाचियाक्षोभा ॥ जयेतेंनदेखतुउभा ॥ आंगचिसांडी ॥ ३३ ॥ कांतेचिया
भिडा ॥ अवलाहोजगायेव्हडा ॥ आंगविलाउघडा ॥ जियेवीण ॥ ३४ ॥ जोहा
ठावमंदरूपें ॥ उवाइलेपणेंचिहारपे ॥ तोजालाजेणेंपडपें ॥ विश्वरूप ॥ ३५ ॥ जि-
याचेवविलाशिवु ॥ वेद्याचेंबोणेंबहू ॥ वाढितेणेसींजेऊं ॥ धालाजो ॥ ३६ ॥ निदै-
लेनिभातारें ॥ जेवियेचराचरें ॥ जियेचाविसंबलानुरे ॥ आमुळेपणही ॥ ३७ ॥ जं-



Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

वकांतुलपूंबैसे ॥ तंववनेणिजेजियाउद्देशें ॥ जियेदोघेंआरिसे ॥ जियादोघां ॥ ३८ ॥
जियेचेनिआंगलगें ॥ आनंदुआपणाआरोगूंलागे ॥ सर्वभोक्तृत्वहीनेघे ॥ जियेवी-
णकांहीं ॥ ३९ ॥ जयाप्रियेचेंजेंआंग॥ जोप्रियूजियेचेंचांग॥ कालऊनिदोनीभाग ॥
जेवीतेअहाती॥४०॥जैसीकांसमिरेंसगटगती ॥ कांसोनयासगटकांती॥ तैशीशिवेसी
शक्ती ॥ आघवीचिजे॥४१॥कांकस्तुरीसकटपरिमळु ॥ कांउष्मेंसकटअनळु॥तैसाश-
क्तीसीकेवळु ॥ शिवुचिजो॥४२॥ नारातिआणिदिवो ॥ पातलींसूर्याचाठावो ॥ तैसीं
आपुल्यासाचीवावो ॥ दोघेंजियें॥४३॥किंबहुनाबियें ॥ प्रणवाक्षरींविरूढतियें ॥ दशे
चींहींवैरियें ॥ शिवुशक्ति ॥ ४४ ॥ हेअसोनामरूपाचाभेदसिरा ॥ गिळीतसेएकार्था-
चाउजिरा ॥ नमोतयाशिववोहरां ॥ ज्ञानदेवोह्मणे ॥ ४५ ॥ जयाच्यारूपनिर्धारीं ॥
गेलीपरेसीवैखरी ॥ सिंधूसीप्रळयनीरीं ॥ गंगाजैशी ॥ ४६ ॥ जयसदोघांच्याआलिं-
गनीं ॥ विरोनिगेलींदोनी ॥ अवघीयाचीरजनी ॥ दिठीचजेवीं ॥ ४७ ॥ नातरीवा-
यूचळबळेसीं ॥ जिरालाव्योमाचियेकुशीं॥ आटलाप्रळयप्रकाशीं ॥ सप्रभभानू॥४८॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

तेव्हींन्याहाळितांययातें ॥ गेलेंपाहणेंनसींपहातें॥ पुढतीघरौतेंवरौतें ॥ वंदिलींतियें ॥
॥ ४९ ॥ जयाच्यावाहाणी ॥ वेदकुवेद्याचेंपाणी ॥ नपियेपणसांडणी ॥ आंगाची-
हीकरी ॥ ५० ॥ तेथेंमीनमस्कारा ॥ लागींउरोंदुसरा ॥ तरीलिंगभेदपन्हां ॥ जोड्डूं
जावों ॥ ५१ ॥ परीसोनेनसींदुजें ॥ नव्हतुलेणेंसोनाभजे ॥ हेंनमनकरणेंमाझें ॥
तैसेंआहे ॥ ५२ ॥ सांधतांवाचेतेंवाचा ॥ ठाऊवाच्यवाचकांचा ॥ पडतांकायभेदाचा ॥
विटाळ्होये ॥ ५३ ॥ सिंधुआणिगंगेचीमिळणी ॥ स्त्रीपुरुषनामाचीमिरवणी ॥
दिसतसेतरीकायपाणी ॥ द्वैतहोईल ॥ ५४ ॥ पाहेपांभास्यभासकता ॥ आपुल्या
ठाईंदाविता ॥ येकपणकायसविता ॥ मोडीतसे ॥ ५५ ॥ चांदाचियादोंदावरी ॥ हो-
तचांदिणियाचीविखुरी ॥ कायउणंदीपावरी ॥ गिवसोपांदीपु ॥ ५६ ॥ मोतिया-
चीकीळ ॥ होयमोतियावरीपांगुळ ॥ आगळेंनिर्मळ ॥ रूपायेकीं ॥ ५७ ॥ मात्रा-
चियात्रिपुटिया ॥ प्रणवुकायकेलाचिराटिया ॥ किंणकारतिरेघटिया ॥ भेदावलाकाई
॥ ५८ ॥ अहोऐक्याचेंमुद्दलनढळे ॥ आणिसाजिरेपणाचालाभुमिळे ॥ तरीस्वतरं-



Mandal, Dhule and the ... Pratishthan, Mumbai

(5A)

गाचीमुकुळें ॥ तुरंबुकांपाणी ॥ ५९ ॥ ह्मणोनिभूतेशुआणिभवानी ॥ वंदिलींनक-
रोनिसिनानी ॥ मीरिघालोंनमनीं ॥ तेंहेंएसें ॥ ६० ॥ दर्पणाचेनित्यागें ॥ प्रतिबिंब
बिंबींरिघे ॥ कांबुडीदीजेतरंगें ॥ वायूचाठेला ॥ ६१ ॥ नातरीनीदजातखेवो ॥
पावेआपुलाठावो ॥ तैसीबुद्धीत्यागेंदेवीदेवो ॥ वंदिलींमियां ॥ ६२ ॥ सांडूनिमी-
ठपणाचालोभु ॥ मिठेंसिंधुत्वाचाघेतलालाभु ॥ तेवींअहंदेऊनिशंभु ॥ शांभवीजा-
लों ॥ ६३ ॥ शिवशक्तिसमावेशें ॥ नमनकेलेंम्यांऐसें ॥ रंभागर्भआकाशें ॥ रिघा-
लाजैसा ॥ ६४ ॥ इतिश्रीसिद्धानुवादश्रीमदमृतानुभवेशिवशक्तिसमावेशनमनंना-
मप्रथमप्रकरणंसंपूर्णम् ॥ १ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥
श्रीगणेशायनमः ॥ ॥ आतांउपायवनवसंतु ॥ जोआज्ञेचाआहेवतंतु ॥ अमूर्त-
चिमूर्तू ॥ कारुण्याचा ॥ १ ॥ अविद्येचेंअडवें ॥ भुंजीतजीवपणाचेंभवें ॥ तया
चैतन्याचेधांवें ॥ धांवेकारुजो ॥ २ ॥ मोडूनिमायाकुंजरु ॥ मुक्तमोतियांचावोग-
रु ॥ जेववितासद्गुरु ॥ श्रीनिवृत्तीवंदूं ॥ ३ ॥ जयाचेनिअपांगपातें ॥ बंधमोक्षपा-

णीआर्ते ॥ भेटेजाणतयाजाणतें ॥ जयापासीं ॥ ४ ॥ कैवल्यकनकाचियादाना ॥ जोनकडसीथोरसाना ॥ द्रष्टयाचेदर्शना ॥ पाठाउजो ॥ ५ ॥ सामर्थ्याचेनिबिकें ॥ जोशिवाचेंहीगुरुत्वजिंके ॥ आत्माआत्मसुखदेखे ॥ आरिसाजियें ॥ ६ ॥ बोधचं-द्राचियाकळा ॥ विखुरलियाएकवेळा ॥ कृपापुनीवलीळा ॥ करीजयाची ॥ ७ ॥ जोभेटलियाचिसवें ॥ पुरतीउपायाचेधांवे ॥ प्रवृत्तिगंगास्थिरावे ॥ सागरींजियें॥ ८॥ जयाचेनिअनवसरें ॥ द्रष्टालेदृश्याचेमोहिरें ॥ जोभेटतखेंवसरे ॥ बहूरूपचिहें ॥ ९॥ अविद्येचेकाळवखें ॥ कींस्वबोधसुदीनेंफांके ॥ सीतलेंप्रसादार्के ॥ जयाचेनी॥१० ॥ जयाचेनिकृपासलिलें ॥ जिवुहाग्रवरीपाखाळे ॥ जेंशिवपणहीवोविळें ॥ आंगी नलवी ॥ ११ ॥ राखोंजातांशिष्यातें ॥ गुरुपणहीधाडिलेंथितें ॥ तरीगुरुगौरवजयातें ॥ सांडीचिना ॥ १२ ॥ एकपणनव्हेसुसास ॥ ह्मणोनिगुरुशिष्याचेंकरूनिमिस ॥ पाहाणेंचिआपुलीवास ॥ पहातचिअसे ॥ १३ ॥ जयाचेनिकृपातुषारें ॥ परतलेंअ-विद्येचेंमोहिरें ॥ परिणमेंअपारें ॥ बोधामृतें ॥ १४ ॥ वेद्यादेतांमिठी ॥ वेदकूहीसूये

पोटीं ॥ तरीनव्हेचिउसिटी ॥ दिठीजयाची ॥१५॥ जयाचेनिसावायें ॥ जिवुब्रह्मउप-
रूलाहे ॥ ब्रह्मतृणातळींजाये ॥ उदासेंजेणें ॥ १६ ॥ उपास्तिवरीराबतिया ॥ उपाय
फळेंयेतीमोड्डूनिया ॥ वरिवंडलेजयाचिया ॥ अनुज्ञाकां॥१७॥ जयाचादिठिवावसंतु॥
जंवनरिघेनिगमवनाआंतु ॥ तंवआपुलियेफळींहातु ॥ नघेपतीही ॥१८॥ पुढेंदृष्टी-
चेनिअलगें ॥ खोंचीकींनिवटीमागें ॥ येव्हढेंयाजेतानेघे ॥ आपणपेंजो ॥ १९ ॥
नाहींतेंजळींबुडिजे ॥ तेंघनवटेंजेणेंतरिजे ॥ जेणेतरिलियाहीनुरिजे ॥ कवणीयेठाईं
॥ २० ॥ लघुत्वाचेनिसुद्दलें ॥ बैसलागुरुत्वाचेसेलें ॥ नासूनिनाथिलें ॥ सदैवजो
॥२१॥ जीवपणाचेनित्रासें ॥ यावयाआपुलियेदशे ॥ शिवहीमुहूर्तपुसे ॥ जयाजो
शियातें ॥२२॥ आकशहेंसावेव ॥ नबंधेआकाशाचीहांव ॥ ऐसेंकोण्हीयेकभरींव ॥
आकाशजें ॥२३॥ चंद्रादिसुशितळें ॥ घडलींजयाचेनिमेळें ॥ सूर्यजयाचेनिउजाळें॥
कडवसेनी ॥२४॥ चांदिणेंस्वप्रकाशाचें ॥ लेइलाद्वैतदुणीचें ॥ तऱ्हींउघडेपणनवचे॥
चांदाचेंजया ॥२५॥ जोउघडकींनदिसे ॥ प्रकाशकींनप्रकाशे ॥ असतेपणेंचिनसे ॥

अमृ० कव्हणीकडे ॥२६॥आतांजोतोइहींशब्दीं ॥ कैंमेळऊंअनुमानाचीमांदी॥ हाप्रमाणा- अ०
॥ ५ ॥ हियेवोंनेदी ॥ कोण्हाहीमाकायी ॥ २७ ॥ जेथेंशब्दाचीलिहीपुसे ॥ तेणेंसीचावळो प्र. २
बैसे॥दुजयाच्यारागींरुसे ॥ येकपणाजो॥२८॥ प्रमाणाचीपरीसरे ॥ तैंप्रमेयचिअवि-
(7) ष्करे॥नवलमेचुइयेधुरे ॥ नाहींपणाची ॥२९॥ कांहिंबाहींअळुमाळु ॥ देखिजेयेखा-
देवेळु ॥ तरीदेखतेंहीविटाळु ॥ जयाच्यागांवीं ॥ ३० ॥ तेथेंनमनेंकांबोले ॥
केउतिसुयेपाउलें ॥ आंगींलाऊनिनाडिलें ॥ नांवचियेणें ॥ ३१ ॥ नव्हेआत्म-
याआत्मप्रवृत्ति ॥ वादवितांकेंनिवृत्ति ॥ यानामाचीबायबुंथी ॥ सांडीचिना ॥ ३२ ॥
निवर्त्यतंवनाहीं ॥ मानिवर्तवीहाकायी ॥ तरीकैसाबैसेठाईं ॥ निवृत्तिनामाच्या
॥ ३३ ॥ परीसूर्यासींअंधःकारू ॥ कैंजालाहोतागोचरू ॥ तऱ्हींतमारीहाडगरू ॥
आलाचिकीं ॥ ३४ ॥ तैसेंलटिकेंयेणेंरुढे ॥ जडयेणेंउजिवडे ॥ नघडे तेंहीघडे ॥ या- ॥ ५ ॥
चियामावा ॥ ३५ ॥ हांगामायावशेंदाविसी ॥ तेंमाईकह्मणोनिवाळिसी ॥ अमा-
यिकतंवनव्हेसि ॥ कवणाहीविषो ॥ ३६ ॥ शिवशिवासद्गुरू ॥ तुजलागूंदाकायकरूं

A joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

॥ येकाहीनिर्धारुधरूं ॥ देतासोकां ॥ ३७ ॥ नामेंरूपेंबहुवसें ॥ उभारुनिपाडिलीं
वोसें ॥ सत्तेचेनिआवेशें॥ तोषलासीना ॥३८॥ जीऊघेतलियाउणें ॥ चालोनेदिसी
साजणें ॥ भृत्युउरेस्वामीपणें ॥ तेंहीनव्हे ॥ ३९ ॥ विशेषाचेनिनांवें ॥ आत्मत्वही
नसाहवे ॥ किंबहुनानव्हावें ॥ कोपहीचयया ॥ ४० ॥ रातीनुरेचिसूर्या ॥ नातरी
लवणपाणिया ॥ नुरेजेवींचेइलिया ॥ निदजैशी ॥ ४१ ॥ कापुराचेंथळिव ॥ नुरवी-
चिआगीचीबरव ॥ नुरेचिरूपनांव ॥ तैसेंयया ॥ ४२ ॥ याच्याहातापायांपडे ॥
तंववंद्यत्वेंपुढेंनमंडे ॥ नपडेचिहाभिडे ॥ भेदाचिये ॥ ४३ ॥ आपणाप्रतिरवी ॥ उ-
दोनकरिजेवीं ॥ हावंद्यनव्हेतेवीं ॥ वंदनासीपैं ॥ ४४ ॥ कांसमोरपणआपुलें ॥
नलाहिजेकांहींकेलें ॥ तैसेंवंद्यत्वघातलें ॥ हारऊनियेणें ॥ ४५ ॥ आकाशाचाआ-
रिसा ॥ नुठीप्रतिबिंबाचाठसा ॥ हावंद्यनव्हेतैसा ॥ नमस्कारासी ॥ ४६ ॥ परीहान-
व्हेतरीनव्हो ॥ हेवेखासेंकांघेवो ॥ परीवंदीतयाहीठावो ॥ उरोंनेदी ॥ ४७ ॥ अंगौ-
नियेकुणाझोळ ॥ फेडितांचितरीतोबाहिरिळ ॥ कडुफिटेआंतुळ ॥ नफेडितांचि

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

॥ ४८ ॥ नानाबिंबपणासरिसें ॥ घेऊनिप्रतिबिंबनासे ॥ नेलैंवंद्यत्वयेणेंतैसें ॥
वंदितेनसीं ॥ ४९ ॥ नाहींरूपाचीजेथेंसोये ॥ तेथेंदृष्टीचेंकांहींचिनव्हे ॥ आह्मांफ-
ळलेहेपाये ॥ ऐशियादशा ॥ ५० ॥ गुणातेलाचियासोयरिका ॥ निर्वाहिलीदीपक-
ळिका ॥ तेकाहोईलपुळिका ॥ कापुराचिया ॥ ५१ ॥ तयादोहोंपरस्परें ॥ होयनाज-
वमेल्हेरे ॥ तंवदोहींचेहीसरे ॥ सरिसेचि ॥ ५२ ॥ तेवींदेखेनामीययातें ॥ तंवगेलेंवंद्यवं-
दिते ॥ चेइलियाकांतें ॥ स्वप्नींचेजेवीं ॥ ५३ ॥ किंबहुनाइयाभारवा ॥ द्वैताचाजेथें
उपरवा ॥ फेडूनियांस्वसरवा ॥ श्रीगुरुवंदिला ॥ ५४ ॥ याच्यासख्याचीनवाई ॥
अंगींएकपणारूपनाहीं ॥ आणिगुरुशिष्यदुवाळीही ॥ पत्राडुकेला ॥ ५५ ॥ कैसा
आपणयाआपण ॥ दोवीणसोयरेपण ॥ हायाहूनविलक्षण ॥ नाहींनानोहे ॥ ५६ ॥
जगआघवेंपोटींमाये ॥ गगनायेव्हढेंहोऊनिठाये ॥ कींतेचिनिशीसाहे ॥ नाहींपणाची ॥ ६ ॥
॥ ५७ ॥ कांपूर्णतेतरीआधारू ॥ सिंधुजैसादुर्भरू ॥ तैसाविरुद्धापाहुणेरू ॥ जया-
च्याघरीं ॥ ५८ ॥ तेजातमातेंकांहीं ॥ परस्परेंनिकेंनाहीं ॥ परीसूर्याच्याठाईं ॥

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan Mumbai.

(8A)

सूर्यचिअसे ॥५९॥ एकह्मणतांभेदे ॥ तेकींनानात्वेंनांदे ॥ विरुद्धेंआपणयाविरुद्धें ॥
होतीलकाई ॥ ६० ॥ ह्मणोनिशिष्यआणिगुरुनाथु ॥ यादोहोंशब्दांचाअर्थु ॥ श्रीगु-
रुचिपरीहोतु ॥ दोहोंठाईं ॥ ६१ ॥ कांसुवर्णआणिलेणें ॥ वसतेंएकेसुवर्णें ॥ वसतें
चंद्रचांदिणें ॥ चंद्रेंचिजेवीं ॥ ६२ ॥ नानाकापूरआणिपरिमळु ॥ कापुरचिकेवळु ॥
कींगोडीआणिगुळु ॥ गुळुचिजेवीं ॥ ६३ ॥ तैसागुरुशिष्यमिसें ॥ हाचिएकुउल्हासे ॥
जऱ्हींकांहींदिसे ॥ दोनीपणें ॥ ६४ ॥ आरिसाआणिमुखीं ॥ मीदिसेहेउखी ॥
हेआपुलियेवोळखी ॥ जाणेमुख ॥ ६५ ॥ पाहापांनिरंजनींनिदैला ॥ तोनिर्विवादु
एकला ॥ परिचेताचेवविताजाला ॥ दोन्हीतोची ॥ ६६ ॥ जेतोचिचेतातोचिचेववी ॥
तेवींहाचिबुझेहाचिबुझावी ॥ गुरुशिष्यत्वनांदवी ॥ ऐसेनहा ॥ ६७ ॥ दर्पणेंवीणडोळा ॥
आपुलेभेटीचासोहळा ॥ भोगितांतरीलीळा ॥ सांगतोंहें ॥ ६८ ॥ एवंद्वैतासीउमसो ॥ नेदूनि
ऐक्यासीविसकुसो ॥ सोयरिकेचाअतिसो ॥ पोखीतसेपुढती ॥ ६९ ॥ निवृत्तिजयानांव ॥
निवृत्तिजयाबरव ॥ जयानिवृत्तिचीराणीव ॥ निवृत्तिचि ॥ ७० ॥ वांचोनिप्रवृत्ति

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

अमृ० विरोधें ॥ कांनिवृत्तिचेनिबोधें ॥ आणिजेंतैसावादें ॥ निवृत्तिनोव्हे ॥ ७१ ॥ आ- अ०
॥ ७ ॥ पणादेऊनिराती ॥ दिवसाआणीउन्नति ॥ प्रवृत्तिवारीनिवृत्ति ॥ नव्हेतैसा ॥ ७२ ॥ प्र. २
वोपसरयाचेंबळ ॥ घेऊनमिरवेकिळ ॥ तैसेंरत्ननव्हेनिखळ ॥ चक्रवर्तिहा ॥ ७३ ॥
(१) गगनहीसुवोनिपोटीं ॥ जैंचंद्राचीपघळेपुटी ॥ तैंचांदिणेंतेणेसिउठी ॥ आंगजयाचें
॥ ७४ ॥ तैसेंनिवृत्तीपणासीकारण ॥ हाचिआपणयाआपण ॥ घेयावयाफूलचि
जालेंघ्राण ॥ आपुलीहृति ॥ ७५ ॥ दिठीसुखाचियेबरवे ॥ पाठीकढूनिजैंफावे ॥
तैंआरिसेधांडोळावे ॥ लागतीकाई ॥ ७६ ॥ कींरातीहनगेलिया ॥ दिवसहनपा-
तलिया ॥ कायसूर्यपणसूर्या ॥ होवावेंलागे ॥ ७७ ॥ ह्मणोनिबोध्यबोधोनि ॥
घेपेप्रमाणेंसाधूनी ॥ ऐसानव्हेभरवसेनी ॥ गोसावीहा ॥ ७८ ॥ ऐसेंकरणियावी-
ण ॥ स्वयंभचिजेंनिवृत्तिपण ॥ तयाचेश्रीचरण ॥ वंदिलेऐसे ॥ ७९ ॥ आतांज्ञा- ॥ ७ ॥
नदेवोह्मणे ॥ श्रीगुरुप्रणामेंयेणें ॥ फेडिलीवाचाऋणें ॥ चौहीवाचांचीं ॥ ८० ॥ ॥
॥ इतिश्रीसिद्धानुवादश्रीमदमृतानुभवे श्रीगुरुस्तवनकथनंनामद्वितीयप्रकरणं सं० २

(9A)

श्रीगणेशायनमः ॥ ॥ ययाचेनिबोभाटें ॥ आत्मयाचीझोंपलोटे ॥ पूर्णतऱ्हींरुण
नफिटे ॥ जेंजेणेंचिनिदकीं ॥ १ ॥ येऱ्हवींपरादिकांचौर्घी ॥ जीवमोक्षाचाउपेगीं ॥
अविद्येसवेंअंगीं॥वेचतीकीरु॥२॥देहासवेंहातपाय ॥ जातीमनासवेंइंद्रियें॥ कांसूर्या
सवेंजाये ॥ किरणजाळ॥३॥नातरीनिदेचियेआवधी॥स्वप्नेंमरतीआधीं॥तेवीअविद्ये-
चियेसंबंथी॥आटतिइया॥४॥मृतेंलोहेंहोतीं ॥ तेरसरूपेंजितीं ॥ जळोनिइंधनेंयेतीं ॥
वन्हिदशे ॥ ५ ॥ लवणअंगेंविरे ॥ परीस्वादेंजळींउरे ॥ निदमरोनिजागरे ॥ जि-
यिजेनिदे ॥ ६ ॥ तेवींअविद्येसवें ॥ चौघींवेचतीजिवें ॥ तत्वज्ञानाचेनिनांवें ॥
उठतीचिया ॥ ७ ॥ हातत्वज्ञानादिवा ॥ मरोनिइहींलावावा ॥ तरिहाहीसिणलेवा ॥
बोधरूपेंचि ॥ ८ ॥ येऊनिस्वप्नमेळवी ॥ गेलीयाआपणपांदावी ॥ दोन्हीदिठीनां-
दवी ॥ निदजैसी॥ ९ ॥ जितीअविद्याऐसी ॥ अन्यथाबोधातेंगिवसी ॥ तेंचियथा
बोधेंसी ॥ निमालीउठी ॥ १० ॥ परीजितीनामेली ॥ अविद्याहेजाकली ॥ बंध
मोक्षींघाली ॥ बांधोनियां ॥ ११ ॥ मोक्षुचिबंधुहोये ॥ तरिमोक्षशब्दकांसाहे ॥

(१०)

परीअज्ञानाघरींत्राये ॥ वाउगीयांची ॥ १२ ॥ बाग्गुलाचेनिमरणें ॥ तोषावेंकींबाळ-
पणें ॥ येरांतोनाहींमांकोणें ॥ मृत्युमानावा ॥ १३ ॥ घटाचेंनाहींपण ॥ फुटलेयाची
नागवण ॥ मानीतसेतेंजाण ॥ ह्मणोंयेकीं ॥ १४ ॥ ह्मणोनिबंधुचितववावो ॥ मा-
मोक्षाकेंप्रस्तावो ॥ परीमरोनिकेलाठावो ॥ अविद्यातया ॥ १५ ॥ आणिज्ञानबंधुऐसें
॥ शिवसूत्राचेनिमिसें ॥ ह्मणितलेंऐसें ॥ सदाशिवें ॥ १६ ॥ आणिवैकुंठीचेनिही
सुजाणें ॥ ज्ञानापाशींसत्वगुणें॥बांधिजेहेंबोलणें ॥ बहुकेलें ॥१७ ॥ परीशिवेंकांश्री-
वल्लभें ॥ बोलिलेंयेणेंचिलोभें ॥ मानुतेंहीलाभें ॥ नबोलतांही ॥ १८ ॥ जेंआत्मज्ञा-
ननिखळ ॥ तेंहींघेज्ञानाचेंबळ ॥ तैंसूर्यचितीसबळ ॥ तैसेंनोहे ॥ १९ ॥ ज्ञानेंश्लाघ्य-
तुआहे ॥ तैंज्ञानपणधाडिलेंवायें ॥ दीपुवांचूनिदिवालाहे ॥ तैंआंगभुललाचिकीं ॥
॥ २० ॥ आपणचिआपणापासीं ॥ नेणतांदेशोदेशीं ॥आपणपेगिवसी ॥ हेंकीरुहो-
य ॥ २१ ॥ परीबहुताकांदियां ॥ आपणापेंआठवलिया ॥ ह्मणेमीयया ॥ कैसारिझों
॥ २२ ॥ तैसाज्ञानरूपआत्मा ॥ ज्ञानेंचिआपुलीप्रमा ॥ करीतसेसोहंमा ॥ ऐसाबंधु

॥ २३ ॥ जेंज्ञानस्वयेंबुडे ॥ ह्मणोनिभारीनावडे ॥ ज्ञानेंमोक्षुघडे ॥ तेंनिमालेनि
॥ २४ ॥ ह्मणोनिपरादिकावाचा ॥ तोश्रृंगारुचौआंगांचा ॥ एवंअविद्याजीवाचा ॥
जीवत्वत्यागीं ॥ २५ ॥ आंगाचेनिइंधनेंउदासु ॥ उठोनिज्ञानाग्निप्रवेशु ॥ करीतेथें
भस्मलेशु ॥ बोधाचाउरे ॥ २६ ॥ जळींजळावेगळु ॥ कापूरनदिसेअवडळु ॥ परी
होऊनिपरिमळु ॥ उरेजेवीं ॥ २७॥ आंगींलाविलीयाविभूति ॥ तैंपरमाणुहीझडती॥
परीपांडुरत्वेंकांति ॥ राहेजैसी ॥ २८ ॥ नावोहळलाआंगींजैसें ॥ पाणीपाणीपणें
नसे ॥ तऱ्हींवोल्हासाचेनिमिसें ॥ आथीचतें ॥ २९ ॥ नातरीमाध्यान्हकाळीं ॥
छायानदिसेवेगळी ॥ असेपायांतळीं ॥ रिघोनियां ॥ ३० ॥ तैसेंग्रासूनिदुसरें ॥
स्वरूपींस्वरूपाकारें ॥ आपुलेपणेंउरे ॥ बोधुजोकां ॥ ३१ ॥ तेंरुणशेषवाचाइया ॥
नफेडवेचिमरोनियां ॥ तेंपायांपडोनिमियां ॥ सोडविलें ॥ ३२ ॥ ह्मणोनिपरापश्यं-
ति ॥ मध्यमाहनभारती ॥ यानिस्तरलियालागती ॥ ज्ञानींअज्ञानींचि ॥ ३३ ॥
इतिश्रीसिद्धानुवादश्रीमदमृतानुभवेवाचारुणमोचननामतृतीयप्रकरणं संपूर्णम्॥३॥

"Joint project of the Rajawade Samshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

## मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---


**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com